स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत तसेच खर्चाच्या हिशोबासोबत सादर करावयाची तसेच आयोगाकडे राजकीय पक्ष नोंदणीसाठीच्या अर्जासोबत सादर करावयाची शपथपत्र/घोषणापत्र स्टॅम्प पेपरवर सादर करण्याची आवश्यकता नसल्याबाबत...

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्रमांक-रानिआ/नपा-२०१४/प्र.क्र.२२/का.५,
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०८/०१/२०१५

वाचा :- १. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.एसईसी/१०९५/१०९/डेस्क-३, दि.७/२/१९९५.
२. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.एसईसी/जीईएन/२००२/प्र.क्र.८५/का.५, दिनांक १५/०३/२००४
३. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.एसईसी/जीईएन/२००१/प्र.क्र.२९/का.१०, दिनांक ३१/०३/२००९
४. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.एसईसी/२००९/प्र.क्र.४९/का.११, दिनांक ३१/०३/२००५
५. शासन आदेश महसूल व वन विभाग क्र.मुद्रांक २००४/१६३६/सीआर ४३६/म-१, दिनांक ०१/०७/२००४

## आदेश

राज्य निवडणूक आयोगाच्या उपरोक्त आदेशान्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविणा-या उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत त्यांच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीबाबत व मत्ता व दायित्वाबाबतचा तपशील देणारे विहित नमुन्यातील शपथपत्र / घोषणापत्र तसेच उमेदवाराच्या अपत्याबाबतचे विहित नमुन्यातील शपथपत्र / घोषणापत्र दाखल करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. यापैकी नामनिर्देशनपत्रासोबत दाखल करण्यात येणारी विहित नमुन्यातील शपथपत्रे ही रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर सादर करण्यात येतात. तसेच निवडणूक लढविणा-या उमेदवारांनी निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसाच्या आत खर्चाचा हिशोब सादर करावयाचा असतो. या हिशोबासोबत उमेदवाराने विहित नमुन्यात शपथपत्र दाखल करणे आवश्यक करण्यात आलेले आहे. याव्यतिरिक्त राज्य निवडणूक आयोगाकडे राजकीय पक्षाची नोंदणी करण्यासाठी दाखल करण्यात येणा-या अर्जासोबत सादर करावयाची विहित नमुन्यातील घोषणापत्रे ही संबंधितांकडून रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर सादर

C:\wagle po data\General letter 2015.docx

केली जातात. तथापि, राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्या दि.०१/०७/२००४ च्या आदेशान्वये जात प्रमाणपत्र / उत्पन्नाचा दाखला / डोमिसाईल सर्टीफिकेट / राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र किंवा इतर कोणत्याही कारणासाठी कोणत्याही शासकीय प्राधिका-यासमोर किंवा न्यायालयात दाखल करण्यात येणा-या शपथपत्र / घोषणापत्रावर मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ मधील तरतुदीनुसार मुद्रांक शुल्क आकारणीतून सूट देण्यात आलेली आहे.

शासन आदेशातील उपरोक्त तरतूद विचारात घेऊन असे आदेशित करण्यात येत आहे की, यापुढे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये नामनिर्देशनपत्रासोबत सादर करण्यात येणारी शपथपत्रे, निवडणूक लढविणा-या उमेदवारांनी निवडणूक खर्चाच्या हिशोबासोबत सादर करावयाचे विहित नमुन्यातील शपथपत्र तसेच आयोगाकडे राजकीय पक्ष नोंदणीसाठीच्या अर्जासोबत सादर करण्यात येणारी विहित नमुन्यातील घोषणापत्रे स्टॅम्प पेपरवर सादर करण्याची आवश्यकता नाही. सदरचे दस्तऐवज साध्या कागदावर तयार करुन आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिका-यासमोर दृढकथन करुन सादर करता येतील.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग,
महाराष्ट्र

प्रत :-

१. सर्व विभागीय आयुक्त
२. सर्व जिल्हाधिकारी
३. सर्व महानगरपालिका आयुक्त
४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
५. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत
६. राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी झालेले सर्व राजकीय पक्ष
७. राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील सर्व अधिकारी / सर्व कार्यासने
८. मा.राज्य निवडणूक आयुक्त यांचे स्वीय सहायक
९. सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक
१०. निवड नस्ती

C:\wagle pc data\Generalletter 2018.docx